नैसर्गिक आपत्ती बाधितांच्या बँक खात्यावर ५९२ कोटी ३४ लाखाची मदत डीबीटीद्वारे वर्ग >> पान 2

पोलीस विभागाशी संबंधित जिल्ह्यातील कामांचे सर्वसमावेशक नियोजन व्हावे : आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली अपेक्षा >> पान 3

दोन वर्षानंतरही कऱ्हाडवाडी पाण्याचा प्रश्न कायम; गावकरी त्रस्त, अधिकारी व कंत्राटदार मात्र मस्त >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



बोमन इराणी- अविनाश तिवारी स्टारर 'द मेहता बॉईज' चित्रपटाचं ग्रँड स्क्रिनिंग
आतील पान

**सुविचार**
लहान लहान प्रयत्न सातत्याने केल्यास मोठे यश मिळते.

apalavidarbhlivenews@gmail.com    मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 177 ■ शुक्रवार, दि. 07 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



# धनंजय मुंडेंना कोर्टाचा मोठा धक्का

## घरगुती हिंसाचारात दोषी, करुणा पत्नी असल्याचा निर्वाळा

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना कोर्टाने मोठा धक्का दिला आहे. करुणा शर्मा या धनंजय मुंडेंच्या पत्नी असल्याचा निर्वाळा कोर्टानं दिला आहे. तर, करुणा शर्मा यांना दरमहा २ लाख रूपये पोटगी देण्याचे आदेशही कोर्टानं दिले आहेत. वांद्रे इथल्या कौटुंबिक न्यायालयानं हा निकाल दिला आहे. त्याशिवाय, धनंजय मुंडे यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचा निर्वाळाही कोर्टाने दिला आहे.

मागील काही महिन्यांपासून धनंजय मुंडे हे चांगलेच वादात अडकले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपीशी असलेल्या संबंधावरून मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. तर, काही दिवसांपूर्वीच कृषी मंत्री असताना त्यांनी घोटाळा केल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर आता करुणा शर्मा यांच्या याचिकेवर वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने निकाल दिला आहे.

कोर्टाने काय सांगितले?

धनंजय मुंडे यांनी घरगुती हिंसाचार केल्याचा आरोप कोर्टाने मान्य केला आहे. वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. त्याशिवाय,करुणा शर्मा यांना दरमहा २ लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश कोर्टाने दिले आहे.

### करुणा शर्मा यांनी काय म्हटले?



करुणा शर्मा यांनी कोर्टाच्या निकालावर समाधान व्यक्त केले. मात्र, पोटगीबाबत आपण दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझे पती यांचे वार्षिक उत्पन्न ६५ कोटी आहे. त्या तुलनेत मला मिळणारी पोटगी ही खूपच कमी आहे. त्यामुळे मला पोटगी वाढवून देण्याची मी मागणी करणार असल्याचे करुणा शर्मा यांनी सांगितले. करुणा शर्मा यांनी दरमहा १५ लाख रुपयांच्या पोटगीची मागणी केली होती. मात्र, कोर्टाने फक्त २ लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले आहेत.

# समृद्धी महामार्ग प्रमाणे शक्तिपीठ मार्गाचाही विरोध मावळेल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** महामार्ग हे विकासाचे 'गेमचेंजर 'म्हणून सिद्ध होतात. समृद्धी महामार्गाने हे सिद्ध केले आहे. सुरुवातीला समृद्धी महामार्गाला विरोध होता. समृद्धी सारखाच या शक्तीपीठ महामार्गाचा विरोध देखील हळूहळू मावळेल, असा आशावाद उपमुख्यमंत्री तथा राज्याचे नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेडमध्ये व्यक्त केला.

एकनाथ शिंदे एक दिवसाच्या नांदेड दौऱ्यावर आले होते. दिवसभरात त्यांचे विविध कार्यक्रम होते. दुपारी गुरुगोविंद सिंघजी नांदेड विमानतळावर आगमनानंतर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नांदेड येथील पवित्र श्री हुजूर साहिब सचखंड गुरूद्वारा येथे भेट देऊन दर्शन घेतले. दुपारी त्यांनी जाहीर सभेला संबोधित केले.

सायंकाळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी शक्तिपीठ महामार्गाचा विरोध ओसरेल असे स्पष्ट केले. ते म्हणाले समृद्धी किंवा शक्तिपीठ सारखे महामार्ग केवळ दळणवळणाची व्यवस्था नाही तर या भागातील कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेला गती देणारे नवीन मॉडेल आहे.



शक्तिपीठ महामार्गाचे महत्व कळल्यावर. भविष्यातील दळणवळणाचे व विकासाचे महत्त्व पटल्यानंतर, विरोध मावळतो. शक्तिपीठ महामार्ग कुठेही जनतेवर लादणार नाही, असे सांगताना जिथे विरोध आहे तिथे काम केले जाणार नाही. त्याठिकाणी रस्त्याची अलाइनमेंट बदलली जाईल. त्याचवेळी त्या-त्या भागाची कनेक्टिव्हिटीही महत्त्वाची आहे.

समृद्धी महामार्गाला प्रारंभी विरोध होता; मात्र त्याची उपयुक्तता सिद्ध होताच विरोध मावळला आहे. अशीच परिस्थिती शक्तिपीठ महामार्गाची असल्याचे शिंदे यांनी सांगितले. सर्वांनी या मोठ्या प्रकल्पासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कोणत्याच योजना बंद होणार नाही

राज्य शासनाची महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना असो वा राज्य सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद केल्या जाणार नाहीत, तसेच यापूर्वीच्या कोणत्याही चांगल्या योजना बंद होणार नाहीत,अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली. उलट मराठवाड्याची दुष्काळवाडा अशी असलेली ओळख दूर करण्यासाठी बंद पडलेल्या योजना महायुती सरकार पुन्हा सुरू करीत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. बंद पडलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड, जलयुक्त शिवार योजना, पुन्हा सुरू करून मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न दूर करण्यात येईल. मराठवाड्यासाठी ११ जलसिंचन योजनांना मंजुरी दिल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील,आ. बालाजी कल्याणकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ.आनंद पाटील बोंढारकर, आ. संतोष बांगर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# माझी लाडकी बहीण योजनेला राज्य सरकारकडून बळकटी

## शासन निर्णय जारी, ५ कोटींचा खर्च करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी महत्त्वाची ठरली आहे. लोकसभा निवडणुकीतील अपयशानंतर महायुती सरकारनं जुलै २०२४ पासून ही योजना लागू करत असल्याची घोषणा केली. या योजनेद्वारे ऑगस्ट महिन्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याची रक्कम देण्यात आली आहे. महायुती सरकारच्या विजयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली आहे. आता या योजनेला बळकटी देण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेच्या कामकाजासाठी संगणक आणि प्रिंटर (स्कॅनरसह) खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून काल जारी केलेल्या शासन निर्णयानुसार संगणक अन् प्रिंटर खरेदीसाठी ५ कोटींपर्यंत खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कामकाजाच्या बळकटीकरणासाठी ५ कोटी रुपयांच्या मर्यादेत संगणक आणि प्रिंटर खरेदीला मान्यता देण्यात आली आहे. हा शासन निर्णय ५ फेब्रुवारीला जारी करण्यात आला आहे. महिला व बालविकास विभाग मुंबई, आयुक्त महिला व बालविकास, पुणे आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अशा एकूण ३८ कार्यालयांमध्ये ५९६ संगणक आणि ७६ प्रिंटर कम स्कॅनर खरेदीला मान्यता देण्यात आली आहे.



>> पान २

# लांडेवाडी येथील जलजीवन मिशनची योजना झाली पास;गावकऱ्यांना नाही पाण्याचा वास..

- अधिकारी, ठेकेदार साहेब कधी करणार यांचा अभ्यास
- लांडेवाडीतील जलजीवन मिशनचे काम रखडलेलेच
- नागरिकांची पाण्याची समस्या कायम
- अधिकारी, पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर –** मेहकर तालुक्यातील अंजनी बुद्रुक मधील एक भाग असलेल्या लांडेवाडी गावातील जलजीवन मिशनच्या कामासाठी २० लाख १५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.या निधी अंतर्गत कामास प्रारंभही करण्यात आला. मात्र,नंतर काम करण्यात न आल्याने गेल्या दोन वर्षांपासून हे काम रखडलेलेच आहे.परिणामी, लांडेवाडी गावातील नागरिकांची पाण्याची समस्या कायम आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे मात्र, लांडेवाडी गावातील नागरिकांना डोक्यावरील हंडा कायम आहे.



**भाग ०६**

तालुक्यातील अंजनी बुद्रुक हे मोठे व राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे गाव आहे. छत्रपती संभाजी नगर हायवेवर असलेल्या या गावाचा विस्तार झपाट्याने झाला आहे. वाढत्या लोकसंख्ये बरोबर त्यांना आवश्यक असलेल्या सुविधा निर्माण व्हाव्या, पिण्याच्या पाण्याची समस्या दूर व्हावी, यासाठी शासनाने जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल २० लाख १५ हजार रुपयांचा निधी मंजूर करून अंजनी बुद्रुक मधील एक भाग असलेल्या लांडगावाडीसाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला.सदर कामास २८ ऑक्टोबर २०२२ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली. ७ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. तर २० डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्यानंतर सदर काम सुरू करण्यात आले. मात्र केवळ पाच टक्के काम झाल्यानंतर सदर काम हे बंद पडल्याने गेल्या दोन वर्षानंतरही पूर्णत्वास नेण्यात आले नाही.सध्या स्थितीत सदर कामासाठी कार्यारंभ आदेश प्राप्त असून बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (जितू सावजी) या कंत्राटदारामार्फत सदर काम करण्यास प्रारंभ करण्यात आला होता. मात्र,अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या निष्काळापणामुळे रखडलेले काम पुन्हा सुरु न केल्याने लांडेवाडी भागातील पाणी समस्या कायम आहे. शासन लाखो रुपये खर्च करून सुविधा देण्यासाठी प्रयत्न करीत असताना अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित व निष्काळजीपणाच्या धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र पिण्याच्या पाण्यासारख्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे.परिणामी अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन लांडेवाडी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून होत आहे.





देविदास खनपटे
मुख्य संपादक

### काम पूर्णत्वास नेण्याबाबत लोकप्रतिनिधीची चुप्पी

अंजनी बुद्रुक गावातील एक भाग असलेल्या लांडेवाडी येथील पाणी प्रश्न कायमचा निकाली निघावा, यासाठी तब्बल वीस लाख रुपयांच्यावर निधीची मंजुरात करून जलजीवन मिशन अंतर्गत कामास प्रारंभ करण्यात आला होता. मात्र सदर कामे सुरू होताच बंद पडले. त्यानंतर बंद पडलेले काम पुन्हा सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी चुप्पी साधल्याने गेल्या दोन वर्षांपासून या कामाला प्रारंभ झाला नाही. परिणामी लांडेवाडी भागातील नागरिकांची पाण्याची समस्या कायम राहिली आहे. लोकप्रतिनिधीने पाठपुरावा करून सदर काम पूर्णत्वास नेले असते तर पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या मार्गी लागली असती. मात्र,लोकप्रतिनिधीच्या या उदासीन धोरणामुळे पाणी समस्या कायम आहे.

# नैसर्गिक आपत्ती बाधितांच्या बँक खात्यावर ५९२ कोटी ३४ लाखाची मदत डीबीटीद्वारे वर्ग

## बुलढाणा जिल्ह्यातील ६७४ लाभार्थींच्या खात्यात १ कोटींची रक्कम जमा

## पालकमंत्री मकरंद पाटील यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी व अन्य घटकांना राज्य शासनाने वेळोवेळी शासन निकषानुसार मदत जाहीर केली होती. यातील ५ लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांना ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार ५३० रुपयांची मदत संबंधित लाभार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत डीबीटीद्वारे आज वर्ग करण्यात आली आहे, यात बुलढाणा जिल्ह्यातील ६७४ लाभार्थींच्या खात्यात १ कोटी २ लाख ५४ हजार ३८७ रुपयांची रक्कम जमा करण्यात आल्याची अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री तथा पालकमंत्री ना.मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

आधारसंलग्न बँक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आलेल्या मदतीमध्ये अतिवृष्टी/पूर सन २०२२, सन २०२३, सन २०२४, अवेळी पाऊस २०२२-२०२३, व २०२३-२०२४, अवेळी पाऊस/अतिवृष्टी २०२३-२०२४, दुष्काळ २०२३ आणि जून २०१९ मध्ये वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या लाभार्थींचा समावेश आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी व नागरीकांना शासनाकडून ही मदत त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग झाल्यामुळे या घटकांना दिलासा मिळेल, असा विश्र्वासही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

मंत्री मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, या मदतीमध्ये अमरावती विभागामध्ये ४ हजार ६७१ लाभार्थ्यांना ७ कोटी ४० लाख २९ हजार ८२० रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यात अकोला जिल्ह्यातील ३६३ लाभार्थ्यांना ५१ लाख ९६ हजार ९४२ रुपये, अमरावती जिल्ह्यातील १ हजार ६३० लाभार्थ्यांना ३ कोटी ६१ लाख ८१ हजार ८८६ रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील ६७४ लाभार्थींना १ कोटी २ लाख ५४ हजार ३८७ रुपये, वाशिम जिल्ह्यातील ४०१ लाभार्थींना ४९ लाख १९ हजार ४८८ रुपये तर यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ६०३ लाभार्थींना १ कोटी ७४ लाख ७७ हजार ११८ रुपयांची मदत वर्ग केली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये ४ लाख ८३ हजार ८८३ लाभार्थींना ५१४ कोटी ८५ लाख २३ हजार २६० रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यात बीड जिल्ह्यातील १ लाख १५ हजार ९१० लाभार्थींना १०६ कोटी १२ लाख ७७ हजार ४२२ रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३ हजार ४६३ लाभार्थींना २ कोटी ४२ लाख ७३ हजार ४७१ रुपये, धाराशिव जिल्ह्यातील २७ हजार ३०७ लाभर्थ्यांना ३६ कोटी २४ लाख ७ हजार ७४८ रुपये, हिंगोली जिल्ह्यातील ५६ हजार ८१ लाभार्थींना ६९ कोटी ७१ लाख ९७९ रुपये, जालना जिल्ह्यातील ८ हजार २४५लाभार्थींना १० कोटी ७४ लाख ७६ हजार ३९७ रुपये, लातूर जिल्ह्यातील २३ हजार ८४१ लाभार्थींना २१ कोटी ३४ लाख ४३ हजार ७५ रुपये, नांदेड जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार २४२ लाभार्थींना २५० कोटी २८ लाख १ हजार ९५२ रुपये आणि परभणी जिल्ह्यातील १५ हजार ७९४ लाभार्थींना १७ कोटी ९७ लाख ४२ हजार २१७ रुपये बँक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत.

कोकण विभागामध्ये ८६५ लाभार्थ्यांना २१ लाख ८१ हजार ७८१ रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केली आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १६ लाभार्थ्यांना १ लाख १० हजार ४८७ रुपये, रत्नागिरी जिल्ह्यातील ३ लाभार्थ्यांना ८ हजार ६०० रुपये, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७०३ लाभार्थ्यांना १२ लाख ८८ हजार ६३४ रुपये, ठाणे जिल्ह्यातील एका लाभार्थीस ९ हजार रुपये, पालघर जिल्ह्यातील १४२ लाभार्थींना ७ लाख ६५ हजार ६० रुपये बॅंक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत.



नागपूर विभागात २० हजार ८९८ लाभार्थींना २६ कोटी ४३ लाख १० हजार ८६४ रुपये बॅंक खात्यावर डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील १७६ लाभार्थींना २२ लाख ५६ हजार २१० रुपये, चंद्रपूर जिल्ह्यातील ५ हजार २८८ लाभार्थींना ४ कोटी ८६ लाख ७४ हजार ७५३ रुपये, गडचिरोली जिल्ह्यातील ६ हजार ७५२ लाभार्थ्यांना ८ कोटी ११ लाख ९४ हजार २१३ रुपये, गोंदिया जिल्ह्यातील ३ हजार १४६ लाभार्थींना ४ कोटी १२ लाख ४७ हजार २२३ रुपये, नागपूर जिल्ह्यातील ३ हजार ८७४ लाभार्थींना ७ कोटी ४० लाख ३० हजार ६७६ रुपये तर वर्धा जिल्ह्यातील १ हजार ६६२ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर १ कोटी ६९ लाख ७ हजार ७९० रुपये डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आले आहेत.

नाशिक विभागात १ हजार ९०९ लाभार्थ्यांना २ कोटी ७१ लाख ९१ हजार ७९१ रुपयांची मदत आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात आली आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात २२८ लाभार्थींना २९ लाख ६६ हजार ५४६ रुपये, धुळे जिल्ह्यातील ११५ लाभार्थींना १३ लाख ६१ हजार ४३७ रुपये, जळगाव जिल्ह्यातील १ हजार २६ लाभार्थींना १ कोटी ८७ लाख २९ हजार ७९५ रुपये, नंदूरबार जिल्ह्यातील ८ लाभार्थींना १ लाख २२ हजार ३१५ रुपये तर नाशिक जिल्ह्यातील ५३२ लाभार्थींना ४० लाख ११ हजार ६९९ रुपयांची मदत डीबीटीद्वारे वर्ग करण्यात अली आहे.

पुणे विभागात २७ हजार ३७९ लाभार्थींच्या बँक खात्यावर ४० कोटी ७२ लाख ५३ हजार १३ रुपयांची मदत डीबीटीद्वारे वर्ग करण्यात आली आहे. यात कोल्हापूर जिल्ह्यातील १ हजार ६४ लाभार्थ्यांना ९९ लाख ६२ हजार ३७ रुपये, पुणे जिल्ह्यातील ३ हजार ३८३ लाभार्थ्यांना २ कोटी ३२ लाख ४५ हजार ९५२ रुपये, सांगली जिल्ह्यातील १ हजार ७८७ लाभार्थ्यांना १ कोटी ७७ लाख ४४ हजार २७९ रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील २१ हजार १४५ लाभर्थ्यांना ३५ कोटी ६३ लाख ७४५ रुपये रुपयांची मदत डीबीटीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात आली.

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# कोरपना तालुक्यातील ग्रामीण रस्त्याची दुरवस्था



दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** कोरपना - तालुक्यातील अनेक ग्रामीण रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. परंतु त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा कळायला मार्गच नाही. लोणी - पिंपरी, नारडा फाटा - नारंडा , तुकडोजी नगर - कोडशी बूज , तांबाडी - गांधीनगर - कोडशी बूज , वणी रोड ते कोडशी खुर्द , पिपरी - शेरज, मागलहिरा - थीप्पा, गोविंदपुर - कोठोडा खुर्द , जेवरा - भोईगुडा, शेरज खुर्द - पिंपरी, गाडेगाव - पैनगंगा नदी पूल , वणी रोड - पारधीगुडा, धोपटाला फाटा - शेरज बु , माथा - लोणी , देवघाट फाटा - देवघाट हनुमान मंदिर, कुसळ - बोरगाव , येरगव्हाण - चनई खू, रूपापेठ - खडकी - जांभूळधरा , घाटराई फाटा - घाटराई देवस्थान, सावलहिरा - घाटराई , बेलगाव - जामगाव , इंजापूर - बेलगांव, कोराडी - तळोधी , कोडशी खू - पिंपरी , झोटिंग फाटा - झोटिंग माईन्स - पिंपरी , निमनी - हिरापूर , कोरपना - कातलाबोडी - बोरगाव , लालगुडा - राजूरगुडा - नांदा , कुकुडसाथ - चिंचोली , कुसळ - कोरपना , हातलोणी - कोरपना , कोरपना तलाव - कन्हाळगाव, इरई फाटा - इरई - भारोसा, पारडी फाटा - पारडी आदी रस्त्यांची अत्यंत दैना झाली आहे. त्यामुळे वाहनधारक व ग्रामस्थांना नियमित जाणे येणे कठीण झाले आहे. यावर लोकप्रतिनिधी व बांधकाम विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

राज्य महामार्गाची दैना

कोरपना - वणी राज्य महामार्ग दरम्यानतील तुकडोजी नगर ते यवतमाळ जिल्हा सीमा, गडचांदुर - वणी राज्य महामार्ग वरील आवरपूर ते सागोडा, तसेच दालमिया सिमेंट ते वनोजा पर्यंतच्या रस्त्याची अवस्था केविलवाणी झाली आहे.त्यामुळे वाहतूकदार व परिसरातील ग्रामस्थ त्रस्त झाले आहे.

# बोमन इराणी- अविनाश तिवारी स्टारर 'द मेहता बॉईज' चित्रपटाचं ग्रँड स्क्रिनिंग

**मुंबई/प्रतिनिधी :**बोमन इराणी आणि अविनाश तिवारी स्टारर 'द मेहता बॉईज' चित्रपटाचं ग्रँड स्क्रिनिंग काल रात्री म्हणजेच ६ फेब्रुवारी मुंबईत आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. बोमन इराणी यांनी 'द मेहता बॉईज' या चित्रपटाद्वारे दिग्दर्शनात पदार्पण केलंय. या चित्रपटात ते देखील एका महत्त्वाच्या भूमिकेत आहे. 'द मेहता बॉईज' चित्रपटात अविनाश तिवारी प्रमुख भूमिकेत आहे. या चित्रपटाची कहाणी वडील आणि मुलाच्या नात्याभोवती फिरणारी आहे. हा कौटुंबिक चित्रपट अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. 'द मेहता बॉईज' चित्रपट ७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. 'द मेहता बॉईज' या चित्रपटाच्या स्क्रीनिंगमधील काही फोटो आणि व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या चित्रपटाच्या स्क्रीनिंगसाठी बोमन इराणी आणि अविनाश तिवारी व्यतिरिक्त चंकी पांडे, सौंदर्या शर्मा, नसीरुद्दीन शाह आणि त्याची पत्नी रत्ना पाठक, तमन्ना भाटिया, दिया मिर्झा, सिकंदर खेर, मोना सिंग, हिरामंडी अभिनेता ताहा शाह बदुशा, रोनित रॉय, ईशान खट्टर, विकी कौशल, पावेल गुलाटी, जूही चावला जॉनी लिव्ह, अनुपम खेर, बिग बॉस १८चा स्पर्धक अविनाश मिश्रा आणि डेझी शाह हे स्टार्स आले होते. या कार्यक्रमात अभिनेत्री दिया मिर्झा साध्या अंदाजात दिसली. तिनं गुलाबी रंगाची साडी नेसली होती. यात ती खूप सुंदर दिसत होती.

पान १ वरून...

# माझी लाडकी बहीण योजनेला राज्य सरकारकडून बळकटी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणच्या प्रसिद्धीसाठी ३ कोटींचा निधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क विभागानं तयार केलेल्या सोशल मीडिया आणि डिजीटल मीडिया प्लॅनसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही मीडियावर प्रत्येकी दीड कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

लाडकी बहीणच्या माध्यमातून महिलांच्या खात्यात ७ हप्त्याचे पैसे जमा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे राज्यातील पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात आतापर्यंत सात हप्त्यांची रक्कम जमा झाली आहे. म्हणजेच एका महिलेला १५०० रुपयांप्रमाणं १०५०० रुपये मिळाले आहेत. जानेवारी महिन्यात साधारणपणे २ कोटी ४१ लाख महिलांना सातव्या हप्त्याची रक्कम मिळाली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे निकष

१. महिला महाराष्ट्र राज्याची रहिवाशी असणे आवश्यक.

२. राज्यातील विवाहीत, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

३. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत.

४. लाभार्थ्याचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते असावे.

५. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

दरम्यान, ज्या महिलेच्या नावावर किंवा तिच्या कुटुंबात चार चाकी वाहन असेल त्या महिला या योजनेस पात्र ठरणार नाहीत.

# छत्रपती शिवरायांबद्दलच्या आक्षेपार्ह विधानाचा बुलढाणा शिवजयंती समितीकडून निषेध..

## राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आजोळी, राजमाता जिजाऊ माँ साहेबांच्या मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात.. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणाच्या वतीने आक्षेपार्ह विधान करणाऱ्या राहुल सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येऊन, मा. मुख्यमंत्री यांच्यासाठी मा. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सोलापूरकर यांच्या निषेधाचे निवेदन देण्यात आले.





छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणाचे अध्यक्ष राजेंद्र काळे यांच्यासह समितीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे निवेदन सादर केले. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी मनाची अस्मिता असून, त्यांच्या आग्रा सुटकेबद्दल अतिशय चुकीचे विधान विकृत पद्धतीने अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केले आहे. या विधानामुळे तमाम मराठी शिवप्रेमींच्या भावनांना हादरा बसला आहे. विशेष म्हणजे एका यूट्यूब चैनलला ही मुलाखत घेणाऱ्या रीमा अमरापूरकर या सोलापूरकर यांच्या विधानावर ज्या पद्धतीने हसून आश्र्चर्य व्यक्त करत होत्या, ती पद्धतही अतिशय विकृत वाटली.. त्यांच्यावरही कारवाई करून सोलापूरकर यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.. त्यासाठी बुलढाणा शहरातील तमाम शिवप्रेमींतर्फे हे विनम्र निवेदन देत असल्याचे यात नमूद करण्यात आले.



तसेच महाराष्ट्रातील तमाम महापुरुषांबद्दल चुकीची विधाने करण्याची विकृती अलीकडे वाढत असून, त्याला पायबंद घालण्यासाठी एखादा कठोर कायदा करण्यात यावा, अशी विनंती मा. मुख्यमंत्र्यांना छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक उत्सव समिती बुलढाणा यांच्यावतीने यावेळी निवेदनातून करण्यात आली.

सदर निवेदन देताना अध्यक्ष राजेंद्र काळे, सचिव उमेश शर्मा, माजी अध्यक्ष ॲड. जयसिंगराजे देशमुख, कोषाध्यक्ष अरविंद होंडे, सांस्कृतिक अध्यक्ष शैलेश खेडकर, निलेश भुतडा, गोपालसिंग राजपूत, मोहन पऱ्हाड, संजय बी. गायकवाड, पवन भालेराव, पप्पू देशलहरा, आशिष चौबे, दिगंबर अंभोरे, आकाश दळवी, डी.एस. चव्हाण आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### बिबट्याच्या वृध्द महिलेचा मृत्यू; नागरिकांनी व्यक्त केला संशय



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बीडच्या पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी शिवारात एका वयोवृद्ध महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात या महिलेचा मृत्यू झाल्याचा संशय परिसरातील नागरिकांकडून व्यक्त करण्यात आला आहे. मागील पंधरा दिवसांपासून मेंगडेवाडी शिवारात बिबट्या दिसून येत आहे. अशातच आज शेतामध्ये जाणाऱ्या सोजरबाई बोबडे यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचा संशय स्थानिकांनी व्यक्त केला. दरम्यान, या घटनेने परिसरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असू,न याची माहिती वनविभागाला देण्यात आलीय. वनविभागाच्या माध्यमातून परिसरात सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे. या प्रकरणावर आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया देत म्हणाले की, अधिकाऱ्यांना या प्रकरणावर अलर्ट देण्यात आलं आहे. आणि जर बिबट्या सापडला तर लवकरात लवकर त्या बिबट्याला बंदिस्त करू आणि योग्य ती प्रक्रिया केली जाईल.

### कार्यक्रम पोलिसांचा आहे, उचलायला लावेल; अजितदादांनी भरला शिट्ट्या वाजविणाऱ्यांना दम

**पिंपरी/प्रतिनिधी :** पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तांलयाच्या इमारतीचे भूमिपूजन, महापालिकेच्या विविध कार्यक्रमांचे भूमिपूजन, उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होत आहे. चिखली, जाधववाडी येथे होत असलेल्या कार्यक्रम ला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएम पीएमएलच्या व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ यावेळी उपस्थित आहेत.



### उष्णतेच्या झळा वाढणार! पुण्यासह मराठवाडा-विदर्भात येत्या २४ तासांत मोठे बदल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून किमान व कमाल तापमानात मोठी वाढ होत असून आता तापमानाचा पारा आणखी वाढणार असल्याचं हवामान विभागानं सांगितलंय. बुधवारी (५ फेब्रुवारी) पुण्यात बहुतांश ठिकाणी कमाल तापमान ३५ अंशांपर्यंत गेलं होतं. तर किमान तापमानाचा पारा १५-१८ अंश सेल्सियसपर्यंत गेला होता. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यासह विदर्भात बहुतांश ठिकाणी असेच तापमान होते. गेल्या काही दिवसांपासून पहाटेही फारसा गारठा जाणवत नसून १० वाजेपासूनच उन्हाच्या झळा जाणवत आहेत.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, उत्तर बांग्लादेशसह इशान्य भारतात असाम आणि परिसरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तरेत हिमालयीन भागात नव्याने पश्रि्चमी चक्रावात सक्रीय होणार आहे. त्यामुळे उत्तरेत दाट धुक्याची चादर आणि प्रचंड थंडी जाणवत आहे. राजस्थान आणि हिमाचल प्रदेशात काही भागात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. दरम्यान, महाराष्ट्रात कोरडे व शुष्क वातावरण आहे. पावसाची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने सांगितलं आहे.

महाराष्ट्रात येत्या पाच दिवसात कोरडे व शुष्क हवामान राहणार असून तापमानात येत्या २४ तासांत वाढ होणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात २-३ अंशांनी वाढ होणार आहे. मराठवाड्यासह विदर्भात ३४-३८ अंशांची नोंद झाली. मुंबईसह कोकणात आर्द्रता जास्त (७०-८०%), तर विदर्भ-मराठवाड्यात ती कमी (४०-५०%) आहे.

विदर्भ आणि मराठवाडा: चंद्रपूर (३८.२ओसी), सोलापूर (३७.३ओसी), लातूर (३६.३ओसी) येथे उन्हाचा तडाखा जाणवत आहे.

कोकण: मुंबई कोलाबा (२७.५ओउ) आणि रत्नागिरी (३१.७ओउ) तुलनेने थंड, परंतु आर्द्रता अधिक होती

पश्रि्चम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्र: पुणे (३५ओसी), नाशिक (३२.९ओसी), कोल्हापूर (३४.७ओसी) मध्यम तापमानात.

राज्यात पावसाची शक्यता नाही, त्यामुळे उन्हाचा प्रभाव वाढणार आहे. फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच उन्हाचा चटका वाढताना दिसत आहे.पुढील काही दिवसात तापमान आणखी वाढण्याची शक्यता आहे, विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात. हवामान विभागाने फेब्रुवारी महिन्यापासून उन्हाच्या झळा तीव्र होणार असल्याचा अंदाज दिलाय. फेब्रुवारी महिन्यात संपूर्ण भारतभर उन्हाच्या झळा जाणवणार असून किमान व कमाल तापमान सरासरीहून अधिक राहणार आहे.मुंबईसह किनारपट्टी भागात तसेच मध्य व उत्तर महाराष्ट्रात तापमानाचा पारा सरासरीहून अधिक राहण्याचा अंदाज आहे.

# पोलीस विभागाशी संबंधित जिल्ह्यातील कामांचे सर्वसमावेशक नियोजन व्हावे : आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली अपेक्षा

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** पोलीस विभागाशी संबंधित जिल्ह्यातील प्रत्येक कामाचे सर्वसमावेशक नियोजन व्हावे. जमिनीचे अधिग्रहण असो किंवा चंद्रपूर जिल्ह्याच्या नवीन पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम असो, कुठलेही काम तुकड्यांमध्ये होऊ नये. त्यात सातत्य राखावे, अशी अपेक्षा राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस विभागाच्या विविध प्रश्नांसंदर्भात गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इक्बाल सिंग चहल यांच्या मंत्रालयातील दालनात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये त्यांनी विभागाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. बैठकीला गृह विभागाचे प्रधान सचिव (विशेष) अनुप कुमार सिंह, सुरेश

**कोर्टीमक्ता येथील वनविभागाची जमीन राज्य राखीव पोलीस बलाकरिता उपलब्ध करून द्यावी**

मेखला राज्य राखीव पोलीस बलाचे अप्पर पोलीस महासंचालक,बल्लारपूरच्या राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशक भाग्यश्री नवटक्के, पोलीस महासंचालकांचे प्रतिनिधी म्हणून सहायक पोलीस महानिरीक्षक प्रकाश जाधव, बल्लारपूरच्या राज्य राखीव पोलीस बलाचे पोलीस उप-अधिक्षक प्रमोद लोखंडे यांची उपस्थिती होती.

बल्लारपुरातील कोर्टीमक्ता येथील वन विभागाची जमीन राज्य राखीव पोलीस बलाकरिता उपलब्ध करून देणे, पोलीस विभागाच्या आरक्षणाखालील जागेच्या भूसंपदनाकरिता निधी उपलब्ध करून देणे, पडोलीची नविन प्रशासकीय इमारत व नविन शासकीय निवासस्थानाच्या बांधकामाकरिता मौजा कोसारा येथील आरक्षण क्र. ८० मधील जागा पोलीस

**चंद्रपूर जिल्ह्यातील पोलीस विभागाच्या विविध प्रश्नांसंदर्भात गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांसोबत बैठक**

विभागाच्या नावे करणे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावित नवीन पोलीस स्टेशनचे बांधकाम करणे यासह विविध विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. डॉ. इक्बाल सिंग चहल व वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मकता दाखवत तातडीने कार्यवाहीचे निर्देश विभागाला दिले.

कोर्टीमक्ता येथील वन विभागाची जमीन राज्य राखीव पोलीस बलाकरिता उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव घ्यावा. प्रस्ताव तयार करण्यासाठी गरज भासल्यास सल्लागार घ्यावा. सर्वसमावेशक नियोजन करून मान्यता घ्यावी. या संदर्भात केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवून पाच वर्षांऐवजी दहा वर्षे सहकार्य मागावे. अपूर्ण निधीमध्ये काम पूर्ण होऊ शकत नाही, याकडेही



आ. श्री. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले. पडोलीची नवीन प्रशासकीय इमारत असो किंवा चंद्रपूर जिल्ह्यातील नवीन पोलीस स्टेशन असो, बांधकामाला तुकड्यांमध्ये मंजुरी देणे योग्य नाही. बांधकामामध्ये सातत्य राखावे, असेही ते म्हणाले.

पोलिस संकुलाच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी चंद्रपूरसाठी दहा पोलीस निरीक्षक अधिकारी द्यावे, असा प्रस्ताव देखील आ. मुनगंटीवार यांनी दिला. नवीन चंद्रपूरसाठी म्हाडाची हजारो एकर जमीन पोलीस संकुलांसाठी आरक्षित आहे. या पोलीस संकुलांसाठी ३५ कोटीची मंजुरी द्यावी, असे आ. श्री. मुनगंटीवार म्हणाले. मुल पोलीस स्टेशनच्या स्थानांतरासाठी पंधरा ते वीस लाख रुपयांची आवश्यकता लागणार आहे, ही बाब देखील आ. श्री. मुनगंटीवार यांनी लक्षात आणून दिली.

## मृत शिक्षकाला दिले परिक्षेचे काम, संबंधित शाळेने माहिती देऊन सुद्धा बोर्डाचा निष्काळजीपणा, गोंदिया जिल्ह्यातील प्रकार

**मुंबई/प्रतिनिधी :** सहा महिन्यांपूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालेल्या शिक्षकाच्या नावाने नागपूर बोर्डाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी एक नव्हे तर तब्बल दोन शाळेत बहिर्गत परीक्षक म्हणून नियुक्ती आदेश दिले आहेत. संबंधित शिक्षक हयात नसल्याची माहिती संबंधित शाळेने बोर्डाला कळविल्यानंतरही बोर्डाने मृत शिक्षकाच्या नावाने आदेश काढले आहे. त्यामुळे बोर्डाच्या अजब कारभाराची सर्वत्र चर्चा आहे.

अधिकची माहिती अशी की, दरवर्षी बोर्डाच्या लेखी परीक्षेपूर्वी प्रत्येक शाळेत विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाते. त्यासाठी इतर शाळेतील विज्ञान शिक्षकाला बहिर्गत परीक्षक म्हणून कोणत्याही एका शाळेत पाठविले जाते. यासाठी बोर्डाकडून विहित नमुन्यात प्रत्येक शाळेतील विज्ञान शिक्षकांची माहिती मागविली जाते. गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा येथील जानकीबाई विद्यालयातील शिक्षक मिलिंद पंचभाई यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

दरम्यान, शिक्षक मिलिंद पंचभाई यांच्या निधनाला सहा महिने लोटले. संबंधित शाळेने शिक्षकाचा मृत्यू झाल्याची माहिती बोर्डाला रितसर पाठविली आहे. तसेच यादीत मिलिंद पंचभाई यांचे नाव पाठविले नव्हते, असे असताना सुद्धा दहावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यासाठी मृतक शिक्षक मिलिंद पंचभाई यांना तिरखेडी आणि बिजेपार या दोन्ही शाळेत बहिर्गत परीक्षक म्हणून जाऊन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचे आदेश पाठविले आहे. हे आदेश प्राप्त होता शाळेला सुध्दा प्रश्न पडला असून बोर्डाच्या अजब कारभाराचा नमुना पुढे आला आहे.

## शुल्लक कारणावरून युवकाची भर दिवसा हत्या; बिबी येथील रामनगरमधील घटना




दैनिक आपला विदर्भ

■ मंगेश तिखट

**चंद्रपूर :** कोरपना तालुक्यातील बिबी येथील रामनगरमधील शिवराज पांडुरंग जाधव (२१) या युवकाची शुल्लक कारणावरून चाकूने गळ्यावर व चेहऱ्यावर सपासप वार करून भर दिवसा हत्या केल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना गुरुवार दि. ६ ला दुपारी १२.३० वाजताच्या दरम्यान घडली.

अविनाश राधाकृष्ण पिल्ले (३०) व आशिष राधाकृष्ण पिल्ले (२४) रा. रामनगर बिबी अशी आरोपीची नावे आहे. सविस्तर वृत्त असे की, घरगुती विषयावरून मृतक व आरोपींचा वाद झाला. गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असलेला अविनाश पिल्ले ह्याने त्याच्या भावाच्या मदतीने शेजारी राहत असलेल्या शिवराजची हत्या करून कब्रस्तानकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला त्याला फेकून दिले.

घटनेची माहिती मिळताच गडचांदूर येथील ठाणेदार शिवाजी कदम सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. घटनेत संपूर्ण परिवार सहभागी असल्याचा आरोप उपस्थित वॉर्डवासीयांनी केला व



मृत : शिवराज पांडूरंग जाधव

संपूर्ण परिवाराला हत्या प्रकरणात आरोपी बनवण्याची मागणी केली. हत्या करतात अविनाश पिल्ले ह्याने पोलिसांना समर्पण केले असून दुसरा आरोपी व आई वडील पोलिसांच्या हाती लागले नाही.

## पश्चिम महाराष्ट्र अभ्यासगटाची नरसिंह संस्थानला भेट



दैनिक आपला विदर्भ

'शोधूया स्वतःला - समजूया महाराष्ट्राला' या मोहिमेअंतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासगटाने ५ फेब्रुवारीला मेहकर येथील श्री नरसिंह संस्थानला भेट दिली. माजी केंद्रीयमंत्री शरद पवार यांच्या संकल्पनेतून यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने 'अभिसरण उपक्रम' यानावाने हा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता.

या अभ्यास गटातील महाविद्यालयीन तरुणांनी नरसिंह मंदिर व संत बाळाभाऊ महाराज जन्मस्थळाचे दर्शन घेऊन संस्थानच्या ज्ञानमंदिर मठाला भेट दिली. ज्ञानमंदिर मठाची वैशिष्ट्यपूर्ण संरचना, आतल्या भागातील स्थापत्य कौशल्य, इतिहासाची आठवण करून देणारे भिंतींमधले पोटजिने, विशाल लोखंडी तुळया आदी वैशिष्ट्यांची पाहणी करून छायाचित्रे घेतली व त्यासंबंधी प्रश्र्न विचारले. याशिवाय पीठाधिश सद्गुरु ड.रंगनाथ महाराज पितळे यांची भेट घेऊन त्यांना आध्यात्मिक विषयांबाबत अनेक प्रश्र्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. यानंतर विश्र्वस्त गोपाल महाराज पितळे व विठ्ठल खंदारकर यांनी संस्थानच्या सामाजिक व धार्मिक सेवाकार्याबाबत माहिती दिली.

या अभ्यासगटात पश्र्चिम महाराष्ट्रातील दर्शन खैरे, गौरव जाधव, रोहित सुतार, सूरज भोसले, कु.रेणुका बांगर, कु.प्रणाली भोपते, समन्वयक अवसरमोल या तरुणांचा समावेश होता. यावेळी पत्रकार रफिक कुरेशी, प्रणित भिसे, घेवंदे आदी उपस्थित होते. संस्थानच्या वतीने पारंपरिक शेला-टोपी व प्रसाद देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला. या नऊ दिवसीय अभ्यास दौऱ्यातील दररोजचा अहवाल शरद पवार यांना पाठविला जात असल्याचे यावेळी खैरे यांनी सांगितले. याशिवाय या अभ्यासगटाने बालाजी मंदिर, कंचनी महाल व डॉ.आंबेडकर सार्व. वाचनालय आदी ठिकाणांनाही भेटी दिल्या.

# अन्यथा राहुल सोलापूरकर यांना ठोकून काढू: संभाजी ब्रिगेड

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** काही दिवसापूर्वी अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी पॅडकॉस्ट कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल बेताल वक्तव्य केलं होतं. आणि हे वक्तव्य गेले चार दिवस सोशल मीडिया तसेच प्रसिद्धी माध्यमांवरती राहुल सोलापूरकर यांनी केलेल्या चुकीच्या वक्तव्याचे व्हिडिओ फिरत आहेत.अशा प्रकारचे वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावण्याचे काम राहुल सोलापूरकर यांनी केलेलं आहे. या वक्तव्याचा जेवढा निषेध करावा तेवढा कमीच आहे आणि म्हणून संभाजी ब्रिगेडच्या वतीने राहुल सोलापूरकर यांना इशारा देण्यात येत आहे की जर त्यांनी कुठल्याही प्रकारचा कार्यक्रम पिंपरी चिंचवड शहरात घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला संभाजी ब्रिगेडच्या स्टाईलने उत्तर दिले जाईल. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त डांगे चौक थेरगाव



येथे अभिनेते राहुल सोलापूरकर यांचे व्याख्यान पार पडत असते परंतु त्यांनी काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटका करत असताना त्यांनी औरंगजेबाच्या सैनिकांना लाच दिली व तेथून आपली सुटका करून घेतली असा उल्लेख करून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केला आहे. असा छत्रपती शिवरायांबद्दल केलेला उल्लेख हा कुठल्याही शिवप्रेमींना न पटणारा आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी शंभूराजांबरोबर आग्र्याहून केलेली सुटका हा पराक्रम संपूर्ण हिंदुस्तानलाच नव्हे तर जगाला हेवा वाटणारा आहे आणि अशा घाणेरड्या पद्धतीने विकृत मानसिकतेतून केलेलं विधान संभाजी ब्रिगेड कदापिही खपवून घेणार नाही आणि म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त डांगे चौक थेरगाव येथे अनेक वर्षांपासून राहुल सोलापूरकर यांचे व्याख्यान पार पडत असते ते व्याख्यान रद्द करावे अन्यथा संभाजी ब्रिगेडकडून अभिनेते राहुल सोलापूरकर यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी काळं फासून ठोकून काढण्यात येईल त्यामुळे सोलापूरकर यांचे सदरील व्याख्यान रद्द करावे अशी विनंती संभाजी ब्रिगेडच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेड पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते व शहर कार्याध्यक्ष विशाल मिठे यांच्या सह्या आहेत

# दोन वर्षानंतरही कऱ्हाडवाडी पाण्याचा प्रश्न कायम; गावकरी त्रस्त, अधिकारी व कंत्राटदार मात्र मस्त

## जल जीवन मिशनचे काम अर्धवट : नागरिकांची पाण्यासाठी भटकंती कायम

**भाग ०५**

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर.तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न्न कायमस्वरूपी विटावा यासाठी तब्बल ९५ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला मान्यता देऊन जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याच्या कामाला दोन वर्षांपूर्वी प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, सदर योजनेचे काम अद्यापही पूर्ण न झाल्याने कऱ्हाडवाडीच्या नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. परिणामी, पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करण्याची वेळ आली आहे.**




### अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा ग्रामस्थांच्या मुळावर

अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे मात्र कऱ्हाडवाडी वासीयांना पाण्या अभावी त्रास सहन करावा लागत आहे. तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथे सन २०२२ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने सदर काम पूर्णत्वास गेले नाही,असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदार यांच्या निष्काळजी धोरणामुळे शासनाचा लाखो रुपयांचा निधी मात्र विनाकारण पाण्यात गेल्याचे चित्र दिसून येत आहे.

याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन येथील रखडलेली पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास न्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होते आहे. तालुक्यातील कऱ्हाडवाडी येथे येथील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा व्हावा, त्यांच्या आरोग्याच्या समस्या दूर व्हाव्या यासाठी तब्बल ९५ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला मान्यता देत दोन वर्षांपूर्वी जल जीवन मिशनच्या कामाला प्रारंभ करण्यात आला होता.२८ ऑक्टोबर २०२२ रोजी सदर कामास तांत्रिक मान्यता देण्यात आली. तर २४ डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (जितू सावजी) या कंत्राटदार मार्फत सदर काम करण्यास प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, काम सुरू झाल्यानंतर कोठे माशी शिंकली आणि काम बंद पडले हे नागरिकांना व शासकीय अधिकारी पदाधिकाऱ्यांना उमजले नाही. परिणामी, दोन वर्षांपासून कऱ्हाडवाडी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येणारा पाणीपुरवठ्याचे काम अद्यापही पूर्णत्वास गेले नाही. परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे.शुद्ध पाणी देण्याचा केलेला वादा हा हवेत जिरल्याने नागरिकांमध्येही तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. तब्बल ९५ लाखावर निधी खर्च करून करण्यात येत असलेल्या या कामाकडे अधिकारी पदाधिकाऱ्याने दुर्लक्ष केल्याने सदर योजना ही रखडलेलीच आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

## विविध वृत्त...

### श्वेता सिंघल यांनी विभागीय आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** श्वेता सिंघल यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार प्र. विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडून आज स्विकारला. श्रीमती सिंघल ह्या यापूर्वी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या सचिव म्हणून राजभवन मुंबई येथे कार्यरत होत्या. त्या भारतीय प्रशासकीय सेवेतील २००९ च्या तुकडीच्या महाराष्ट्र कॅडरच्या अधिकारी आहेत.

### अकोला आणि अमरावती जिल्हा हे बांग्लादेशींना बोगस नागरिकत्व प्रमाणपत्र मिळण्याचे केंद्र - सोमय्या





दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला शहरातल्या रामदास पेठ पोलिस ठाण्यात भाजपा नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्यांनी पुराव्यासह अनेक ठिकाणी तक्रार नोंदवली आहे. तर अकोला आणि अमरावती जिल्हा हे बांग्लादेशींना बोगस नागरिकत्व प्रमाणपत्र मिळण्याचे केंद्र झाल्याचा आरोप भाजपानेते आणि माजी खासदार किरीट सोमय्यांनी केला आहे. तर अकोल्यात १६ जणांनी बोगस कागदपत्राच्या आधारवर जन्म दाखले घेतल्याचा दावा सोमय्यांनी केलाय. याचे रीतसर पुरावेसह रामदास पेठ पोलिसांत तक्रार दिली आहे. तर केंद्राकडे एक पत्र देणार असल्याचे सोमय्या म्हणालेत तर महाराष्ट्रप्रमाणे इतर राज्यात असे प्रकार असू शकतात, त्यामुळं चौकशी व्हावी, अशी मागणी केंद्राला करणार असल्याचे सोमय्या म्हणालेत.

### उज्वल निकमांच्या नियुक्तीवरुन धनंजय देशमुख सुरेश धसांच्या भेटीला, चर्चेनंतर निर्णय होण्याची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सगळ्या आरोपींचे पुन्हा रिमांड घ्या अशी मागणी धनंजय देशमुख वारंवार करत आहेत .यासाठी सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करावी अशी मागणी सुरेश धस यांनी केल्यानंतर या संदर्भात चर्चा करण्यासाठी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख भाजप आमदार सुरेश धस यांची भेट घेणार आहेत .या प्रकरणात आता वकिलांची आवश्यकता आहे. रिमांड संदर्भात कुठपर्यंत प्रक्रिया झाली आहे यासंदर्भातही चर्चा करणार असल्याचे करण्याचं धनंजय देशमुख म्हणाले.

धनंजय देशमुख आमदार सुरेश धस यांचे भेट घेण्यासाठी आष्टीकडे रवाना झाले आहेत .उज्वल निकम यांच्या नियुक्तीबाबत चर्चा करून निर्णय घेण्याची शक्यता आहे.

## डोणगावचा दहा वर्षांपासून पाणी प्रश्न सुटेना

**नागरिकांना पाणी विकत घेऊन पिण्याची वेळ : पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करण्याची मागणी**

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगांव येथील पाणी प्रश्न्न गेल्या दहा वर्षांपासून सुटला नसल्याने येथील नागरिकांना पाणी विकत घेऊन पिण्याची वेळ आली आहे. तर, पाच वर्षात एकदाही नळाचे पाणी आले नाही, त्यामुळे पेनटाकळी ते डोणगाव पाणीपुरवठा योजनेची अमलबजावणी करून कार्यन्वित करावी, अशी मागणी शंकर जिनिंग प्रेसिंग संस्थेच्या संचालिका नसीम अख्तर शेख अय्युब व गावातील महिला व पुरुषांच्या वतीने डोणगांव ग्रामपंचायतीचे सरपंच,सचिव यांना २७ जानेवारी रोजी निवेदनाद्वारे केली आहे.



डोणगांव येथील ग्रामपंचायत प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, डोणगांव ग्रामपंचायतीच्या वतीने पाणी पुरवठा करण्यात न आल्याने मागील १० वर्षा पासून विकतचे पाणी घेवून पियावे लागत आहे. तर, मागील ५ वर्षांपासून डोणगाव नळ योजनेतून एकदाही नळ आलेले नाहीत. असे असतांना सुद्धा सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय पेय जल योजना ग्रामीण पाणीपुरवढा यांच्या अंतर्गत नेतंसा, मादणी, आरेगाव डोणगाव ही योजना राबविण्यात आली. ही योजना चौकशीच्या फेऱ्यात अडकलेली आहे. याच योजनेला डोणगाव ग्रामपंचायतने पाणी पुरवढा विभागाला सदर योजना आम्ही ताब्यात घेत नाही म्हणून पत्र दिले आहे. याच डोणगाव ग्रामपंचायतने पेनटाकळी ते डोणगाव पाणीपुरवढा योजनेची मागणी केलेली आहे.गावातील महिला आणि पुरुषांना मागील १० वर्षांपासून पाण्यासाठी भटकंती करावी, लागत आहे.

पुन्हा जुनीच योजना राबवण्याचा प्रयत्न केला तर, भविष्यात पुढील ३० वर्ष योजना फेल होण्याची शक्यता आहे. तरी डोणगांववासीयांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्र्न लक्षात घेता पेन टाकळी ते डोणगाव पाणीपुरवठा योजना राबविण्यात यावी,अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर शेकडो नागरिकांसह महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अवैध रेतीची वाहतूक करताना ट्रॅक्टर पकडला; तलाठी यांनी केली कार्यवाही



दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** अवैध रेती भरून वाहतूक करीत असलेल्या ट्रॅक्टर वर मंगळवार ला सायंकाळी ५. ३० वाजताच्या दरम्यान पळसगाव बस स्टॉप जवळील दौलत गजभिये यांच्या घरा जवळ सदर ट्रॅक्टर पकडण्यात आला.

गावातील नागरिकांना घरकुल साठी रेतीची वाहतूक करणाऱ्या एक ट्रॅक्टर तलाठी शुभम बदकी यांनी पकडून ट्रॅक्टर जप्त करून चिमूर तहसील कार्यालयात जमा करून जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.सदर ट्रॅक्टरवर चालक म्हणून मंगलदास बनसोड.तर विना नंबरचा ट्रॅक्टर वर रेतीची वाहतूक केल्या जात होती.

सदर कारवाई चिमूर चे तहसीलदार श्रीधर राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पळसगाव साझ्याचे तलाठी शुभम बदकी, कोतवाल प्रदीप पाटील यांनी केली आहे. या कारवाईमुळे रेती तस्करांचे धाबे दणाणले असून आहे.

## पुण्यात रंगणार राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** हिंदू गर्जना प्रतिष्ठान व पुनीत बालन ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने 'हिंदू गर्जना चषक महिला व पुरुष राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२५ येत्या दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत रंगणार आहे. या कुस्ती स्पर्धेसाठी तब्बल ४५ लाखांची बक्षिसे असून खुल्या विजेत्याला महिंद्रा थार गाडी, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजारांचे बक्षिस दिले जाणार आहे. पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन आणि हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे अध्यक्ष धीरज रामचंद्र घाटे यांनी या स्पर्धेविषयी माहिती दिली.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होणार आहे. टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेत खुला गट हा राज्यस्तरीय पुरुष आणि महिला असा असणार असून इतर गट पुणे शहर आणि जिल्हा अशा स्वरूपाचा असणार आहे. खुल्या गटातील पुरुष विजेत्याला महिंद्रा थार, चांदीची गदा आणि २ लाख ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह असे बक्षीस देण्यात येणार आहे.

# पोटखराबा क्षेत्र लागवडीयोग्य होणार

## आजपासून १० एप्रिलपर्यंत जिल्हा प्रशासनाचा कालबद्ध कार्यक्रम जाहिर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अभिलेखामध्ये पोटखराब क्षेत्र बऱ्याच शेतकऱ्यांनी सुधारणा करुन लागवडीखाली आणली आहे. त्यामुळे वर्ग अ मधील क्षेत्र जमीन धारकांना लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दि. ५ फेब्रुवारी ते १० एप्रिल २०२५ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुषंगाने कार्यपद्धती निश्र्चित करण्यात आली असून या कालबद्ध कार्यक्रमाचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नुकतेच जारी केले आहे.

राज्यातील अधिकार अभिलेखामधील पोटखराब क्षेत्र बऱ्याच शेतकऱ्यांनी सुधारणा करुन लागवडीयोग्य आणलेले आहे. सदर सुधारणा केलेल्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या नोंदी अधिकार अभिलेखांमध्ये न घेतल्यामुळे शेतकऱ्यांना विविध लाभ मिळत नव्हते. तसेच जमीनधारकाने पोटखराब वर्ग (अ) खाली येणारी जमीन लागवडीखाली आणली तरी त्यावर कोणतीही आकारणी करता येत नव्हती. वर्ग अ खाली येणारी जमीन धारकास कोणत्याही वेळी लागवडी खाली आणता येणार आहे. सदर क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे त्याकरिता अतिरिक्त आकारणी केली जाणार असून कालबद्ध कार्यक्रमानुसार टप्पे निश्र्चित करण्यात आले आहे.



कालबद्ध कार्यक्रमानुसार...

पहिल्या टप्पात दि. ५ ते १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी संबंधित गावातील सर्व सर्व्हे/गट नंबर निहाय पोटखराब वर्ग अ ची माहिती गाव नमुना नंबर सात बारावरुन तयार करणे. दुसऱ्या टप्पात दि. ११ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारीपर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी गावच्या चावडीमध्ये अथवा दवंडीव्दारे कळवून किंवा स्थळ पाहणी करण्यासाठी नोटीस पाटविणे. तिसरा टप्पात दि. १७ ते २४ फेब्रुवारीपर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पोटखराब वर्ग अ क्षेत्र लागवडीखाली आणले असल्याची खात्री करुन तसा जबाब पंचनामा व हस्तस्केच नकाशा तयार करणे.

चौथ्या टप्पा दि. २५ फेब्रुवारी ते ४ मार्च परिशिष्ट १ अ मधील पात्र स.नं./गट नंबरची एकत्रित यादी परिशिष्ट १ ब मध्ये तयार करणे. पाचव्या टप्पात दि. ५ मार्च ते ८ मार्च परिशिष्ट-१ ब बाबतचा अहवाल ग्राम महसूल अधिकारी यांनी मंडळ अधिकारी यांचेकडे सादर करावे. सहाव्या टप्पात दि.९ मार्च ते १२ मार्च २०२५ पर्यंत मंडळ अधिकारी यांनी किमान १० टक्के स.नं. किंवा गट नंबरची स्थळ पाहणी करुन पडताळणी अंती शिफारशीसह अहवाल तहसिलदार यांचेकडे सादर करणे.

सातव्या टप्पात दि. ९ मार्च ते १२ मार्चपर्यंत तहसिलदार यांनी गावनिहाय माहिती उप अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविणे. आठव्या टप्पात दि.१३ ते १८ मार्चपर्यंत उपअधिक्षक भुमिअभिलेख यांनी संबधित सर्व्हे नबंर/गट नंबरच्या मुळ वर्गीकरण नकाशा (सर्व्हे नबंर गाव नकाशा, प्रतिबुक प्रत फाळणीबुक, मोजणी इत्यादी) अभिलेखावरुन गाव नमुना नं सातबारा दर्शविलेले क्षेत्र हे पोटखराब वर्ग अ असल्याची खात्री करणे. तसेच आवश्यक त्या अभिलेखांच्या प्रतिसह आवश्यक असल्यास जागा पाहणी करुन व सुधारित आकारणी ठरवुन अभिप्राय तहसिलदार यांना पाठविणे. नव्या टप्पात दि. १९ मार्च ते २६ मार्च २०२५ पर्यंत तहसीलदार यांनी त्यांचे अभिप्रायासह अहवाल संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर करणे. दहाव्या टप्पात दि. २७ मार्च ते ३१ मार्चपर्यंत जमीन धारकाने लागवडीखाली आणलेले क्षेत्र पोटखराब वर्ग अ मधील असल्याची खात्री झाल्यानंतर जमीन महसूल सुधारणा नियम २०१८ अनव्ये सुधारीत नियम २ (२) मधील तरतुदी नुसार उपविभागीय अधिकारी यांनी अंतिम आदेश पारित करावा. ११ व्या टप्पात दि. १ एप्रिल ते ५ एप्रिलपर्यंत या कालावधीत उपविभागीय अधिकारी यांचे कडील आदेशानुसार उपअधीक्षक भूमिअभिलेख यांनी गावनिहाय कमी जास्त पत्रक मंजूर करुन तहसिलदार यांचेकडे गाव वहिवाटीस पाठवावे. १२ व्या टप्पात दि. ६ ते १० एप्रिलपर्यंत उपविभागीय अधिकारी यांचेकडील आदेश व उपअधीक्षक भूमिअभिलेख यांचेकडील कमी जास्त पत्रकानुसार ग्राम महसूल अधिकारी यांनी अधिकार अभिलेखास गाव नमुना नं १ व ७ मध्ये अंमल घ्यावा.

निश्चित कालबध्द कार्यक्रमाकरीता संबंधित उपविभागीय अधिकारी व जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात असून संबंधित उपविभागाने कालबध्द कार्यक्रम विहित मुदतीत पुर्ण करावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.